# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

## छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

**UGC Care Listed Journal**

**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●

## डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,

हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३

मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-३]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे    डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

| | | |
|---|---|---|
| डॉ. सुभाष बागल | डॉ. ताहेर पठाण | डॉ. दिलीप बिरुटे |
| डॉ. सुभाष शेकडे | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. प्रेमला मुखेडकर |
| डॉ. एकनाथ शिंदे | डॉ. दत्तात्रय डुंबरे | डॉ. रंजना कदम |
| | डॉ. राज मुसणे | डॉ. सुखदेव इथारे |

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

| | | |
|---|---|---|
| १६. | छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी | ६३ - ६७ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे | ६८ - ७० |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- सुशीला लक्ष्मण जगधने | ७१ - ७२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी<br>- डॉ. विकास मोहन सरनाईक | ७३ - ७६ |
| २०. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | ७७ - ७९ |
| २१. | शिवकालीन भाषा व लेखनपद्धती<br>- डॉ. सायली आचार्य | ८० - ८४ |
| २२. | मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे | ८५ - ८८ |
| २३. | मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण<br>- योगिता चोडणकर | ८९ - ९३ |
| २४. | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास<br>- डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड | ९४ - ९६ |
| २५. | स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था<br>- अविनाश सुदाम भालेराव | ९७ - १०० |
| २६. | शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण<br>- शहेनाज देशमुख | १०१ - १०४ |
| २७. | सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे | १०५ - १०८ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- किशोर शेषराव चौरे | १०९ - १११ |
| २९. | महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व<br>- डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड | ११२ - ११५ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ | ११६ - ११९ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख | १२० - १२३ |



# शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी

- डॉ. श्वेता बा. चौधारे
हिंदी विभाग,
मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई, ता. नेवासा, अहमदनगर, महाराष्ट्र – ४१४ १०५
ई-मेल : choudhares@gmail.com, मो. ९८९०२२३३९४

महाराष्ट्रासारख्या कणखर आणि दगडाच्या देशात परंपरेच्या रूपाने लढाऊ बाणा, वृत्ती म्हणून अंगीकारला गेला. स्वराज्य स्थापन करताना ही वृत्ती शिवबा आणि यांच्या अनुयायांना नवी जरी नसली, तरी समुद्राच्या रूपाने नव्या दिशा आणि नव्या आशा स्वराज्याला खुणावत होत्या. समुद्रावर स्वार होण्याच्या इच्छा या फक्त स्वराज्य विस्ताराच्या मनसुब्यातून तयार झालेली फक्त भ्रांत नव्हती, तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीचा परिपाक होता. इ.स. १६५५-५६ मध्ये जावळी सर केल्यावर रायगड किल्ला स्वराज्यात आला आणि स्वराज्याची हद्द समुद्राला जाऊन भिडली. तेव्हा स्वराज्याचा संबंध सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज, डच, फेंच या सत्तांशी आला. सिद्यांची राजधानी दंडराजपुरी येथील जंजिरा किल्ल्यावर होती. किनारपट्टीवर धाडी घालणे, लूट करणे, जाळपोळ करणे, बायका पळवणे, लोक बाटवणे हा सिद्यांचा जुना धंदा होता. या सगळ्याची दखल शिवाजी महाराजांनी घेतली होती. सिद्दी आणि युरोपीय व्यापारी शक्ती याच सागरी किनाऱ्याचा वापर करत स्वतःचे सामर्थ्य वाढवू पाहत आहे, तर दुसरीकडे समुद्री चाच्यांच्या सर्व गतिविधी व दंडाराजपुरीच्या अबेसिनियनचा धुमाकूळ याकडे शिवाजी महाराजांचे लक्ष होते. म्हणून स्वतंत्र, सामर्थ्यवान आरमार निर्माण झाल्याशिवाय स्वराज्याला पूर्णत्व येणार नाही, हे महाराजांनी जाणले होते. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र', 'आरमार हे एक स्वतंत्र्य राज्यच आहे' हे सूत्र शिवाजी महाराजांना चांगल्या प्रकारे माहीत होते. दुर्दैवाने समुद्रकिनारे आपले जरी असले तरी तिथे अधिकार दाखवता येत नव्हता. अनेक वर्षांपासून पोर्तुगीज समुद्रावर आपले स्वामित्व मानत होते. कार्ताजसारखा परवाना त्यांच्याकडून घ्यावा लागे, तेव्हा काही वस्तूंची आयात व निर्यात होई. त्यावेळच्या परकीय सत्तांमध्ये मुघल, जंजिऱ्याचे सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज हे प्रामुख्याने स्वराज्यापुढील संकट होते. यापैकी मुघल वगळता, इतर तिघांचा पश्चिम किनाऱ्यावर मोठा धाक होता. या तिघांना कर दिल्याशिवाय कोणत्याही नौका समुद्रात विहार करू शकत नसत. मराठ्यांच्या व्यापाराला हा मोठा अडथळा होता.

शिवाजी महाराजांनी बहादूरखान प्रसंगानंतर आपल्या लोकांचे संरक्षण तसेच शत्रूंना शिक्षा या दुहेरी दृष्टीतून बंदरांचा विकास व व्यापारवृद्धीसाठी आरमार हे ध्येय समोर ठेवले. म्हणजे फक्त समुद्रावर ताबा हे त्यांचे ध्येय नव्हते; पण त्रासदायक शेजाऱ्यांवर वर्चस्व यात ते समाधानी होते. इसवी सन १६५७-५८ च्या सुमारास कल्याण, दुर्गाडी किल्ला या रूपात महाराज कोकणात उतरले असावेत; कारण मुस्लीम किंवा मराठी इतिहासकार या आरमारनिर्मितीची निश्चित तारीख देऊ शकले नाहीत. नियोजनपूर्ण कार्य करण्याच्या शिवरायांच्या हातोटीमुळे कदाचित कल्याणला खाडीकिनारी स्वराज्याच्या पहिल्या आरमाराची मुहूर्तमेढ रोवण्यापूर्वी शिवाजी महाराजांनी सारा खाडी प्रदेश पालथा घातला असला पाहिजे. महाराजांच्या या नवीन मुलुखगिरीमध्ये समुद्र ज्यांच्या नसानसांत होता, चिकाटी आणि समुद्राचा अनुभव इतरांपेक्षा जास्त होता, असे आगरी, कोळी, भंडारी, भोई, खारवी, पालदी जवान सामील झाले आणि कोकणची किनारपट्टी स्वराज्यात सामील होऊ लागली. खाफीखान, सभासद यांच्या साहित्यात फक्त महाराजांनी समुद्रात लष्कर निर्माण केले, हाच उल्लेख मिळतो. कास्मो द गार्दा हासुद्धा महाराजांच्या आग्रा सुटकेनंतर त्यांच्या आरमार योजनेबाबत निर्वाळा देतो. १६६४ मधील शिवाजीराजांच्या नाविक हालचालींबद्दल कल्पना येते. १६६२ मध्ये ज्याओ दी साल्झार दी वास्कोनसेलोस हा पोर्तुगालच्या राजापुढे शिवाजी महाराजांच्या आरमाराचे वृत्त देतो.

शिवरायांनी सुरुवातीला खोल समुद्रातल्या दळणवळणापेक्षा किनाऱ्याचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने

आरमाराचे काम सुरू केले. कल्याण, भिवंडी, पेण या ठिकाणी जहाजबांधणीचे काम सुरू झाले. शिवकालीन जहाजांच्या प्रकारात संदेशवाहक होडी, पिण्याचे पाणी ने-आण करण्यासाठी होड्या, मचवा हे एक छोटे २५-४० सैनिकांचे जहाज, शिबाड हा मालवाहू जहाजाचा प्रकार आहे, ज्यावर तोफाही बसवल्या जात. गुराब हे जहाज शिबडापेक्षा मोठे जहाज, ज्यावर सुमारे १००-१५० सैनिक व पिछाडीस एक तोफ असे, तिरकती, पगार इ. अन्य जहाजांचा समावेश असे. ही बांधणी दर्जेदार व्हावी, या उद्देशाने हे काम पोर्तुगीज खलाशी लुई व्हेगास आणि त्याचा मुलगा फेर्ना व्हेगास यांच्यावर सोपवण्यात आले. त्यांच्यासोबत काही मराठी कारागीर हे काम करत होते. व्हेगास यांच्याकडून आपल्या कारागिरांना नौकाबांधणीचे प्रशिक्षण मिळावे, हा यापाठीमागचा उद्देश होता. शिवाजीराजांच्या आरमारी व्यवस्थेत २०० जहाजांचा एक सुभा केला जात असे. मायनाक भंडारी व दौलतखान हे आरमाराचे प्रमुख अधिकारी होते. तीन डोलकाठ्यांची जहाजे व्यापाराकरिता मस्कतपर्यंत जात असत. आरमाराचे संरक्षण किनाऱ्यावरील किल्ले व खाड्या यामुळे होत असे. आरमारात कोळी, भंडारी, गाबित, भोई, खारवी, पालदी-मुसलमान व इतरांचा भरणा असे.

जहाजबांधणी करताना महाराज अतिशय दक्ष होते. नावेसाठी लागणारे लाकूड रयतेला त्रास न होता उपलब्ध झाले पाहिजे, असे त्यांना वाटत असे. आज्ञापत्रात उल्लेख आहे : 'आरमारास तख्तं, सोट, डोलाच्या काठ्या आदीकरून थोर लाकूड असावे लागते, ते आपल्या राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत त्यांचे चे अनुकूल पडेल, ते हुजुर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहीत जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची; परंतु त्यास हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन की, ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात यैसे नाही.

रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली, ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावर काये? या वृक्षांच्या अभावे हानीहि होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल, तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे.' जनहिताचा राज्यकारभार करण्याची महाराजांची दृष्टीच या आज्ञापत्रातून आपल्या लक्षात येते.

जहाजबांधणीत कमी पडलेली आंबा आणि फणसाची लाकडे महाराजांनी कर्नाटकातून मिळवली. सुरुवातीच्या काळात नौका तयार झाल्यावर त्या खोल समुद्रात जाण्यासाठी पोर्तुगिजांमुळे अडचण होत होती. पुढे महाराजांचे आरमार पश्चिम समुद्रातून विहार करू लागले, तशी जहाजांची संख्या चारशेपर्यंत गेली. महाराजांनी आरमाराचं नियोजनही अत्यंत सुव्यवस्थितपणे केलेलं होतं. दोनशे जहाजांचा ताफा करून त्यावरती सुभा, दौलतखान, मायनाक भंडारी, वेंटगी सांगी म्हणजेच दर्यासारंग, इब्राहिम खान असे नामांकित अधिकारी नेमले आणि समुद्रावर दरारा निर्माण केला. पुढं खोल समुद्रात जाणाऱ्या नौकाही बांधण्यात आल्या. इराण, बसरा, मक्का या ठिकाणांशी व्यापारास सुरुवात झाली. शिवरायांच्या आरमारात सुमारे पाच हजार सैनिक होते.

सुरत लुटीमधील धनाचा उपयोग शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामासाठी केला. समुद्रातले दळणवळण सोयीचे व्हावे आणि गोव्याच्या पोर्तुगिजांवर धाक बसावा हा यापाठीमागचा मुख्य उद्देश होता. किल्ल्याच्या बांधकामाची जबाबदारी हिरोजी इंदुलकर यांच्यावर सोपवण्यात आली. ज्यांनी शिवरायांच्या आग्रा संकटकाळात स्वतःचे दागदागिने गहाण टाकून किल्ला पूर्ण केला.

समुद्रावर सत्ता स्थापन केल्यास भविष्यात त्यातून काय फायदा होऊ शकते, हे महाराजांनी वेळीच जाणले होते आणि त्यामुळे त्यांनी आरमाराच्या ताकदीबरोबर जोड म्हणून जलदुर्गांच्या बांधणीचे कार्यदेखील हाती घेतले. आरमारासाठी बळकट जलदुर्गाची निर्मिती झाली पाहिजे, असे महाराजांना वाटत असे. कोणतीही अत्याधुनिक साधन-संसाधने नसताना समुद्रात उभारलेल्या जलदुर्गांच्या बांधकामतंत्राकडे आजही एक आश्चर्य म्हणूनच पाहिले जाते. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी, पद्मदुर्ग यासारखे अनेक जलदुर्ग बांधून शिवाजी महाराजांनी समुद्रावर आपली सत्ता स्थापन केली. या जलदुर्गांच्या बांधकामातून महाराजांची दूरदृष्टी दिसून येते.

सिद्दीच्या ताब्यातील मुरूड-जंजिऱ्याच्या किल्ल्याजवळ शिवाजी महाराजांनी पद्मदुर्ग (कांसा) हा किल्ला बांधला. पद्मदुर्ग वसवून दुसरी राजापुरी उभी केली. सन १६७२ मध्ये मुंबईजवळच्या खांदेरी बंदरावर शिवरायांनी किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. मुंबईला आणि पर्यायाने इंग्रजांना धाक बसावा हा यापाठीमागचा उद्देश होता. उत्तर कोकणातले

दळणवळणही यामुळे सुलभ होणार होते. शिवाजी महाराजांनी भिवंडीच्या रक्षणासाठी भिवंडीच्या भुईकोटाजवळ जहाजांचा काफिला तैनात करून त्याची देखभाल व दुरुस्तीही भिवंडीच्या बंदरात सुरू केली. याची माहिती १६ ऑगस्ट १६५९ रोजी फ्रॅन्सिस्को-द-मेलो-ए-कस्ट्रो आणि अँटोनिया-डी-सोझा कुतिन्हो या ठाणे-वसईच्या गव्हर्नरांनी आपल्या राजाला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'आदिलशहाचा सरदार शहाजी याच्या मुलाने वसई, चौलजवळचा प्रदेश जिंकला असून कल्याण, भिवंडी, पनवेल येथे आरमार व सैन्य सजविले आहे. म्हणून आम्ही आमच्या कप्तानांना हुकूम देऊन ठेवला आहे की त्यांच्या गलबतांना अटकाव करा.' शिवाजी महाराजांची आरमारी जहाजे ही अरुंद व नालेचा भाग लांबलचक निमुळता असल्यामुळे पाणी सहजपणे कापीत चपळतेने पुढे जात. वेगवान हालचाली हे आरमाराचे वैशिष्ट्ये. त्याबद्दल १ नोव्हेंबर १६७९ रोजी इंग्रज कप्तान मुंबईच्या गव्हर्नरला लिहितो, 'शत्रूची (शिवाजी महाराजांची) गॅलव्हेटस आमच्या समोरून सहज निघून जातात. आमची शक्ती त्यांच्यापुढे चालत नाही; कारण या लहानशा होड्या आम्हाला सहज व आश्चर्यकारकपणे चकवतात.' यावरूनच राजांचे आरमाराबाबतचे धोरण स्पष्ट होते. याच आरमाराने खांदेरीच्या मोहिमेच्या वेळी इंग्रजांची पाचावर धारणा बसवली. जे इंग्रज सुरुवातीला याच आरमाराला नावे ठेवीत होते, तेच इंग्रज १ नोव्हेंबर १६७९ च्या पत्रात लिहितात, "त्या लहान सरपटणाऱ्या होड्या आम्हाला आश्चर्यकारक रीतीने चकवतात. आता आम्हाला असे वाटू लागले आहे की, आमच्याकडे तसल्या होड्या असतील तर आम्हालाही मदत होऊ शकेल." पत्रातील या उल्लेखावरूनच स्वराज्याच्या आरमाराची महती कळते.

आरमाराचे सरनौबत, सरखेल, असे हुद्दे निर्माण करून महाराजांनी आपल्या आरमाराची एक आखीव, रेखीव मांडणी केली. महाराजांनी केलेली हीच रचना आजदेखील आपल्याला पाहावयास मिळते. आज नौदलात अनेक बदल झाले आहेत. त्याचे आधुनिकीकरण झाले आहे; पण तरीही त्याचा मूळ पाया हा छत्रपतींच्या आरामारावरच आधारलेला आहे. खऱ्याअर्थाने जनहिताचे शिवराज्य निर्माण करायला समुद्राने शिवरायांची खंबीर साथ दिली. शिवरायांचे आरमार त्यांची विज्ञाननिष्ठा, आधुनिकता आणि भविष्याचा वेध यांचा त्रिवेणी संगमच म्हणावा लागेल.

**संदर्भ -**


१. 'मराठ्यांची लष्करी व्यवस्था' - डॉ. एस. एन. सेन - डाइमंड पब्लिकेशन - पृष्ठ १३२

२. 'द मराठाज' - डॉ. स्टुअर्ट गौर्डन- डाइमंड पब्लिकेशन - पृष्ठ ७२

३. 'श्री राजा शिवछत्रपती' - भाग १- गजाजन भास्कर मेहेंदळे - पृष्ठ ८७३

४. 'मराठ्यांचा इतिहास' - डॉ. जी. बी. शहा, डॉ. एस. डी. खैरनार - प्रशांत पब्लिकेशन - पृष्ठ १४९

५. https://www.google.com/amp/s/maharashtratimes.com/editorial/ravivar-mata/shivramaya-armaram-thane-creek-and-portuguesa/amp_articleshow/64429383.cms

६. https://www.google.com/amp/s/www.esakal.com/amp/saptarang/article-prashant-sarudkar-chhatrapati-shivaji-maharaj-262379

७. https://www.mumbaitak.in/news/shivjayanti-special-sea-armada-and-chhatrapati-shivaji-maharaj

८. https://www.tusharmane.com/2016/12/blog-post.html?m=1


◆◆◆◆◆



MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।ध्रु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

– महात्मा जोतिराव फुले

